नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/07/2023 (शनिवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १७ किमी अंतरावर नेरला येथे दिनांक १४/०७/२०२३ चे ०१.१५ वा. २.०० वा. दरम्यान मौदा पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, नेरला येथे एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता संशयीत बोलेरो पिकअप गाडी वाहन मिळुन आल्याने त्या वाहना जवळ जावुन त्याची पाहणी केली असता सदर वाहनात **आरोपी नामे– विनोद हरीचंद्र खेडकर रा. भुगाव वार्ड नं. ०१ मौदा** हा बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. एच.– ४०/ सी. एम.– ०५९५ किंमती अंदाजे ३,००,०००/–रू. मध्ये ५ बैल किंमती अंदाजे ७५,०००/–रूपयाचा मुद्देमाल ज्यांच्या मुसक्या आवळुन वाहनाच्या पल्ल्याला जनावरांना हालचाल करता येणार नाही अशा पद्धतीने बांधुन त्यांना क्रुरतेची वागणुक देत वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीच्या ताब्यातून असा एकुण वाहनासह ३,७५,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस हवालदार भगवान चांदेवार पोस्टे मौदा यांचे रीपोर्टवरून पोस्टे मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ५ अ, ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, ११ (१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक श्रीराम डोईफोडे ब. नं. २१४९ पोस्टे मौदा मो. क्र. ९८२३३०१४७४ हे करीत आहेत.

## फसवणुक

पो.स्टे. बुट्टीबोरी :– अंतर्गत ०२ कि. मी अंतरावरील जुनी वस्ती बुट्टीबोरी येथे दिनांक १४/०७/२०२३ चे १९.४० वा. पर्यंत फिर्यादी नामे– जिवनलाल हरिशंकर तिवारी, वय ४६ वर्ष, रा. जुनी वस्ती बुट्टीबोरी यांनी मोबाईलचे फेसबुकवर प्रिमीयम डि. डि. पावर सेवर मेक्स या प्रोडक्सची ॲड पाहीली व प्रोडक्स पसंत आले म्हणुन ऑनलाईन ऑर्डर केले. दि. ११/०७/२०२३ ला shiprocket tx-shprkt कंपनी ब्ल्यु डार्ट कंपनी व्दारा फिर्यादीला प्रिमीयम डि. डि. पावर सेवर मेक्स डिलीवरी झाली व फिर्यादीचे ऑडरचे पैसे ६७८/– रू. फोन पे केले. ऑर्डरचा बॉक्स खोलुन बघितला तेव्हा प्रोडक्स खराब असल्याचे दिसले म्हणुन ब्ल्यु डार्ट कंपनीला कस्टमर केअर क्र. १८६०२३३१२३४ या नंबर फोन लावला व फिर्यादीला जो प्रोडक्स मिळाला तो खराब आहे. म्हणुन प्रोडक्स रिटर्न करायचा आहे. कस्टमर केअरने फिर्यादीला म्हटले कि, मटेरिअल वापस होवुन जाईल व पैसे हि वापस होवुन जाईल असे म्हणुन फिर्यादीचे मोबाईल फोनवर कुरीयर डिटेल्स नावाने लिंक पाठविली. ते लिंक ओपन करून डिटेल्स पाठवायला सांगितले. फिर्यादीने लिंक ओपन करून स्वत:ची डिटेल्स लोड करून ऑनलाईन पाठविली थोडया वेळाने मोबाईल वर ओ.टि. पी. नंबर आला व फिर्यादीने त्यांना ओ. टि. पी. नंबर सांगितला पुन्हा दुसऱ्या मोबाईल फोन वरून कॉल आला व जो ओ.टि. पी. नंबर बरोबर नाही म्हणुन दुसरा ओ.टि. पी. नंबर पाठवित आहे. फिर्यादीने त्यांना ओ. टि. पी. नंबर सांगितला. व फिर्यादीला म्हणले की, तुमचे पैसे परत आले आहे ओ.टि. पी. नंबर डिलीट करून टाका. थोडया वेळा नंतर फिर्यादीला समजले कि, त्याचे युनियन बॅक अकाउंट मधुन २०००००/–रू. व १८४०००/–रू असा एकुण ३८४०००/–रू. विड्राल झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ डी माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक ठाकुर पोस्टे बुट्टीबोरी हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**